क्रमांक : जमीन २६८२/२९०५-ग-८

महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक : २०-८-१९८४.

विषय : जमीन : मुंबई उपनगर जिल्हा
स.नं. ८०, मंडाळा पैकी सुमारे ५ एकर-१६ गुंठे शासकीय जमीन, चिकुवाडी, चेंबूर येथील डिपार्टमेंट ऑफ अॅटोमिक एनर्जी यांच्या मालकिच्या जमिनीवरील बंजारा जनजाती झोपडपट्टीवासीयांच्या पुनर्वसनासाठी गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभागास, हस्तांतरीत करण्याबाबत.

ज्ञापन

वरील विषयाच्या संदर्भात, अप्पर जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा, मुंबई यांना असे कळविण्यात येते की, स.नं. ८०, मंडाळा या शासकीय जमिनीपैकी घाटकोपर मानखुर्द जोड मार्गाच्या पश्चिम बाजूवी, घाटकोपर-मानखुर्द जोड मार्ग व सायन पनवेल महामार्गाच्या नाक्यावरील, स.नं. १२८ मानखुर्दच्या औद्योगिक रेखांकनातील जमिनीला लागून असलेली सुमारे ५ एकर १६ गुंठे जमीन, चिकूवाडी, अणुशक्ती नगर, चेंबूर येथील डिपार्टमेंट ऑफ अॅटोमिक एनर्जी यांच्या मालकिच्या जमिनीवर सध्या वास्तव्य करुन असलेल्या बंजारा जनजाती झोपडपट्टीवासीयांच्या पुनर्वसनासाठी, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभागाकडे हस्तांतर करण्यास या आदेशाद्वारे शासनाची मंजूरी देण्यात येत आहे.

२. प्रश्नाधीन जमिनीची प्रत्यक्ष मोजणी व तिचे सिमांकन करुन, मग सदर जमिनीचा प्रत्यक्ष ताबा गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभागाला देण्यात यावा.

३. प्रश्नाधीन शासकीय जमीन नेहमीच्या अटी व शर्ती, अप्पर जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा मुंबई यांना योग्य वाटतील, अशा आणखी काही अटी व शर्ती यांच्या शिवाय खाली उल्लेखिलेल्या विशिष्ट अटी व शर्ती यांना अधिन राहून गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभागाला हस्तांतरीत करण्यात येत आहे :-

अ] ज्या कारणासाठी प्रश्नाधीन जमीन हस्तांतरीत करण्यांत आली आहे, त्याच कारणासाठी तिचा वापर करण्यात यावा.

कृ.मा.प..

ब] प्रश्नाधीन जमीन किंवा तीचा कांही भाग ज्या कारणासाठी गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभागास हस्तांतरीत करण्यात आली आहे, त्या कारणासाठी नको असल्यास सदर जमीन महसूल विभागास परत करण्यात यावी.

क] जमिनीचा ताबा घेतल्यावर सदर जमिनीचे अतिक्रमणापासून संरक्षण करण्याची संपूर्ण जबाबदारी गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभागाची राहील.

४. हे आदेश नगर विकास विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ शि. गो. ओक ]
अवर सचिव,
महसूल व वन विभाग.

प्रति,
अप्पर जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हा, मुंबई.

प्रत रवाना :-

१] विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भावन, नवी मुंबई.
२] महालेखापाल [२], महाराष्ट्र, नागपूर
३] प्रशासक, बृहन्मुंबई महानगरपालीका, मुंबई
४] उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई, मुंबई
५] अप्पर जिल्हाधिकारी [अतिक्रमण] मुंबई व मुंबई उपनगर जिल्हा, मुंबई.
६] नगर विकास विभाग [न. वि. ५]
७] गृहनिर्माण व विभाग [ ७ -अ]
८] वित्त विभाग [इएक्सपी-९]
९] "ग-८", "ग-३", "ग-४", "ग-५", "ग-६" व "ग-७", कार्यासने, महसूल व वनविभाग
१०] निवड फाईल / "ग-८[२]" कार्यासन, महसूल व वनविभाग.
११] महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रादेशिक विकास-प्राधिकरण, मुंबई.

Scanned by CamScanner

[illegible]

अप्पर जिल्हाधिकारी यांचे कार्यालय
मुंबई उपनगर जिल्हा
जुने जकात घर, फोर्ट, मुंबई-४०००२३.
तारीख १२ -९-१९८४.

वाचावे :- शासन ज्ञापन क्रमांक जमिन/२९८२/२१०७/ग-८
दिनांक २०-८-१९८४.

**" आदेश "**

मौजे मंडाळा, स.नं. ८० येथील शासकीय जमिनीपैकी घाटकोपर मानखुर्द जोड मार्गाच्या पश्चिम बाजूची घाटकोपर मानखुर्द जोड मार्ग व सायन पनवेल महामार्गाच्या नाक्यावरील, स.नं. १३८ मानखुर्दच्या औद्योगिक क्षेत्रामधील जमिनीला लागून असलेली, सुमारे ५ एकर १६ गुंठे जमिन चिकूवाडी, अण्णाभाऊ नगर, चेंबूर येथील, डिपार्टमेंट आफ अॅटोमिक एनर्जी यांच्या मालकीच्या जमिनीवर सध्या वास्तव्य करुन असलेल्या बंजारा जमाती झोपडपट्टीवासीयांच्या पुर्नवसनासाठी, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभागाकडे, खालील दिलेल्या अटी शर्तीनुसार हस्तांतरीत करण्यात येत आहे.

१) ज्या कारणासाठी प्रश्नाधीन जमिन हस्तांतरीत करण्यात आली आहे, त्याच कारणासाठी, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभागाने तिचा वापर करावा.

२) प्रश्नाधीन जमिन किंवा तिचा काही भाग ज्या काही कारणासाठी गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभागाला हस्तांतरित करण्यात आलेली आहे, त्या कारणासाठी नको असल्यास, सदर जमिन महसूल विभागास परत करण्यात यावी.

३) प्रश्नाधिन जमिन गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभागाने अप्पर जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांच्या पूर्व परवानगी शिवाय कोणालाही कोणत्याही प्रकारे किंवा गहाण/भाडेपट्टी/पोट भाडेकरु इत्यादी प्रकारे हस्तांतरीत करु नये.

४) जमिनीचा ताबा घेतल्यापासून सदर जमिनीचे अतिक्रमणापासून संरक्षण करण्याची संपूर्ण जबाबदारी गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभागाची राहील.

अप्पर जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हा.